वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)
ई-मेल : reg_mau@rediffmail.com
दूरध्वनी : (०२४५२) २२९७५५
वेबसाईट : www.vnmkv.ac.in
फॅक्स : (०२४५२) २२९७५५,२२३५८२

## निवेदन

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी जाहीरात क्रं.वनामकृवि-१/२०१४, दिनांक २५.११.२०१४ अन्वये **प्रयोगशाळा सहाय्यक/प्रयोगशाळा सहाय्यक (गृहविज्ञान)** या पदांच्या पदभरतीकरीता पात्र उमेदवारांकडून लेखी परीक्षेकरीता अर्ज मागविण्यात आले होते.

त्यानुसार प्राप्त अर्जाची छाननी करुन घेण्यात आली असून या यादीतील लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना सूचीत करण्यात येते की, त्यांना केवळ लेखी परीक्षा देण्यासाठी पात्र करण्यात येत आहे. भविष्यात लेखी परीक्षेनंतर उमेदवारांनी अर्ज भरतेवेळी जोडलेल्या कागदपत्रामध्ये काही त्रुटी आढळल्यास व नमूद केलेल्या पदाकरीता अपात्र ठरत असल्यास केवळ लेखी परीक्षेकरीता पात्र ठरविले म्हणून नियुक्तीकरीता दावा किंवा हक्क मागता येणार नाही.

तसेच **प्रयोगशाळा सहाय्यक / प्रयोगशाळा सहाय्यक (गृहविज्ञान)** या पदाकरीता पात्र/अपात्र उमेदवारांची प्रवर्गनिहाय यादी (अपात्रतेच्या कारणासह) विद्यापीठ संकेतस्थळावर **www.vnmkv.ac.in** प्रसिध्द करण्यात आली आहे. पात्र/अपात्रतेबदूल कोणाचे काही आक्षेप असल्यास त्यांनी **दिनांक ३१/१२/२०१९** पर्यंत कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचेकडे लेखी म्हणणे पुराव्यासह सादर करावे. सदर तारखेनंतर विद्यापीठास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, तसेच याबाबत नव्याने सादर केलेली कोणतेही कागदपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाहीत यांची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

**प्रयोगशाळा सहाय्यक / प्रयोगशाळा सहाय्यक (गृहविज्ञान)** या पदाकरीता मागविण्यात आलेल्या अर्जांची संख्या जास्त असल्यामुळे अर्जाची छाननी मे. **SMB System Pvt.Ltd., Mumbai** यांचे कडुन करुन घेण्यात आलेली आहे. जर काही उमेदवारांची नावे पात्र/अपात्र यादीत नसल्यास त्यांनी अर्ज सादर केलेल्या पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

**मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने.**

जा.क्रं.अेपीपी-१८/२०१९
दिनांक १७/१२/२०१९

(रणजीत आ.पाटील)
**कुलसचिव**